R.No. MHHMAR/25/A3029

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : १७

दि. २५ डिसेंबर २०२५, वार : गुरुवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## कुटुंब कल्याण व लसीकरण कामात लातूर शहर महानगरपालिकेची राज्यात भरारी

### नोव्हेंबर २०२५ च्या अहवालात लातूर मनपाला राज्यात तिसरा क्रमांक

लातूर / प्रतिनिधी :-राज्य कुटुंब कल्याण



कार्यालय, पुणे यांच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या नोव्हेंबर २०२५ अखेरच्या कुटुंब कल्याण, माता-बाल संगोपन व लसीकरण कार्यक्रमाच्या कामगिरी अहवालात लातूर महानगरपालिकाने राज्यात तिसरा क्रमांक पटकावला आहे. ही कामगिरी लातूर शहराच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेसाठी मोठे यश मानले जात आहे.

या उल्लेखनीय कामगिरीमागे मनपा आयुक्त मानसी मीना यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य विभागाने केलेले नियोजनबद्ध कार्य कारणीभूत ठरले आहे. उपयुक्त वसुधा फड, आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण यंत्रणेने प्रभावी कामगिरी बजावली.



यामध्ये विशेष योगदान देणाऱ्या अधिकाऱ्यांमध्ये माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. श्यामा जाधव, लसीकरण नोडल ऑफिसर डॉ. सुनीता कदम, तसेच साथरोग अधिकारी डॉ. स्वाती मजगे यांचा समावेश आहे.

माता-बाल आरोग्य व लसीकरणात प्रभावी अंमलबजावणी राज्यस्तरीय अहवालानुसार, गर्भवती मातांची वेळेवर नोंदणी आवश्यक तपासण्या व पाठपुरावा

बालकांचे पूर्ण लसीकरण Hep B, Vit- - आणि नियमित लसीकरण कार्यक्रमांची काटेकोर अंमलबजावणी या सर्व बाबींमध्ये लातूर महानगरपालिकेची कामगिरी समाधानकारक ठरली आहे. शहरी भागात घरभेटी, जोखीम गटातील माता व बालकांवर लक्ष केंद्रित करून आरोग्य सेवा पोहोचवण्यात आल्या.



मैदानी कर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदान या यशामध्ये वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेविका, आशा वर्कर्स, कर्मचारी तसेच सर्व मैदानी कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमांचा मोठा वाटा असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

आरोग्य विभागाने ही कामगिरी पुढेही कायम राखत लातूर महानगरपालिकेला राज्यात अव्वल स्थानावर नेण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवणार असल्याचे आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती यांनी सांगण्यात आले आहे.

## लोकहिताच्या लढ्याचा एक भाग म्हणून वंचित ने संधी दिली तर संधीचे सोने करीन..!

नवी मुंबई / के. एच. हनवते :-



वंचित बहुजन आघाडी राष्ट्रीय अध्यक्ष : ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे स्वाभिमानी आणि कणखरनेतृत्व स्वीकारून गेल्या ८ वर्षापासून नवी मुंबई, बेलापूर विधानसभा या क्षेत्रात भारिप बहुजन महासंघ ते वंचित बहुजन आघाडीत मा. उपाध्यक्ष या पदावर कार्यरत असणारा, बुद्ध, शिवाजी. फुले शाहू , आंबेडकरांच्या विचारांचा नवी मुंबईचा बुलंद आवाज, स्वाभिमानी बाणा, निर्भीड पत्रकार, बौद्धाचार्य : कल्याणराव हनवते यांनी नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक लढविण्याचा निश्चय केला असून त्यांनी इच्छुक उमेदवारी अर्ज २३ डिसेंबर २०२५ रोजी वंचित बहुजन आघाडी नवी मुंबई जिल्हा कार्यालयात जमा केला. त्यावेळी संपर्क माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, लोकहिताचा एक भाग म्हणून मी नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीच्या रिंगणात (सर्वसाधारण प्र. क्र. २३) मधून इच्छुक उमेदवार म्हणून सर्व ताकदीनिशी मैदानात उतरणार आहे, मी नाही भीत कुणाच्या बापाला हातभार लावणार भीम रथाला..! काबीज करो गल्ली तभी तो मिलेगा दिल्ली..! आणि म्हणून वंचित बहुजन आघाडीने मला यावेळी संधी दिल्यास मी या संधीचा आपल्या प्रभागातील जनतेच्या, लोकहिताचे काम करणार व संधीचे सोने करणार..! असे स्पष्ट आणि प्रखर उद्गार कल्याणराव हनवते यांनी काढले. त्यावेळी वंचित बहुजन आघाडी नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : अश्रवजीत जगताप, महिला जिल्हाध्यक्ष : शिल्पाताई रणदिवे, नवी मुंबई महासचिव : सुनील भोले, तसेच कार्यालयीन नवी मुंबई महासचिव : मल्लिनाथ सोनकांबळे इत्यादी पदाधिकाऱ्यांच्या उपस्थित पक्ष कार्यालयात इच्छुक उमेदवारी अर्ज जमा केला. भीक नको सत्तेची सत्ता हवी हक्काची..!

ऊट बहुजना जागा हो महाराष्ट्राचा राजा हो..!

बहुजन सारे एक होऊ सत्ता आपल्या हाती घेऊ..!!

संविधान के सन्मान में हम सब मैदान मे..! लढेंगे... जितेंगे..!!.

## पुरातत्व विभागाने प्राचीन मंदिरांच्या संवर्धनाचे काम वेळेत पूर्ण करावे - प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम

नाशिक (जिमाका वृत्तसेवा): नाशिक त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या आगामी कुंभमेळ्यासाठी देश विदेशातील कोट्यावधी भाविक येतील. कुंभमेळ्यातील अमृत स्नानाबरोबरच ते नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथील प्राचीन मंदिरांना भेट देतील. त्यामुळे राज्य पुरातत्व विभागाने




त्यांच्याकडील मंदिर संवर्धनाचे काम नियोजित वेळेत पूर्ण होईल, अशी दक्षता घ्यावी, असे निर्देश विभागीय आयुक्त तथा नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात आज दुपारी नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणातर्फे विविध विषयांवर चर्चेसाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, नाशिक वनवृत्तचे मुख्य वनसंरक्षक जी. मल्लीकार्जुन, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, उपवनसंरक्षक सिध्देश सावर्डेकर, राकेश सेपट, भारतीय पुरातत्व विभागाच्या छत्रपती संभाजी नगर मंडळाचे अधीक्षक शिवकुमार भगत (दूरदृष्यप्रणालीद्वारे), जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे, लेखा व कोषागारे विभागाचे सह संचालक बी. डी. पाटील, पोलिस उपायुक्त किरणकुमार चव्हाण, राज्य पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक अमोल गोटे, त्र्यंबकेश्वर नगरपालिकेचे मुख्याधिकारी राहुल पाटील यांचेसह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

अध्यक्ष डॉ. गेडाम म्हणाले की, कुंभमेळा कालावधीत नाशिकचे धार्मिकतेबरोबरच ऐतिहासिक व पर्यटनाच्यादृष्टीने ब्रॅण्डींग होणे आवश्यक आहेत. याकरीता शहर व परिसरातील सर्व पुरातन मंदिरे, धार्मिक, ऐतिहासिक व पर्यटनस्थळांचाही विकास होणे आवश्यक आहे. याकरीता याठिकाणी अधिक चांगल्या सोयीसुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहेत. याकरीता सर्व संबंधित विभागांनी भाविक व पर्यटकांना आकर्षित करेल अशी विकासकामे नियोजनपूर्वक करावीत. प्राचीन मंदिरांच्या परिसरात त्यांचे महत्व विशद करणारे माहितीफलक उभारावेत. प्राचीन मंदिरांच्या ठिकाणी पौराणिक संदर्भाच्या अनुषंगाने सुशोभीकरणाचे नियोजन करण्याच्याही सुचना त्यांनी यावेळी दिल्यात.

यावेळी राज्य पुरातत्व विभागामार्फत रामकुंड व शहर परिसरातील स्वामीनारायण मंदिर, नारोशंकर मंदिर, अजगरेश्वर बाबा समाधी, काशी विश्वेश्वर मंदिर, एकमुखी दत्त मंदिर ते बालाजी कोट, सांडव्यावरची देवी मंदिर आदिंचे संवर्धनाचे सुरु असलेल्या कामांचा तसेच त्र्यंबकेश्वर येथील प्रयागतीर्थ, गौतमेश्वर मंदिर, संगमतीर्थ, जुने कुशावर्त, इंद्रकुंड, मुकुंदतीर्थ, दर्शनपथ आदि ठिकाणी करण्यात येणाऱ्या कामांचा आढावा घेण्यात आला. या कामांचे सादरीकरण श्री. गोटे यांनी केले. तर वन विभागामार्फत ब्रम्हगिरी व अंजनेरी पर्वत येथे करण्यात येणाऱ्या कामांची माहिती उपवनसंरक्षक श्री सावर्डेकर यांनी दिली. त्याचबरोबर भविष्यात पहिणे, दुगारवाडी, हरिहरगड, कावनई येथे करावयाच्या कामांबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली.




## सर्वसामान्यांसाठी लढणारे संवेदनशील नेतृत्व हरपले - उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई : माजी मंत्री, ज्येष्ठ नेते सुरूपसिंग नाईक यांच्या निधनामुळे महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रातील अनुभवी, लोकाभिमुख, संवेदनशील व मार्गदर्शक नेतृत्व हरपले असल्याची शोकभावना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त करत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या शोकसंदेशात म्हणाले की, माजी मंत्री सुरूपसिंग नाईक हे आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी सातत्याने लढा देणारे एक लढवय्ये नेतृत्व होते. त्यांनी आपल्या दीर्घ राजकीय कारकिर्दीत विविध खात्यांचा कार्यभार अत्यंत समर्थपणे सांभाळला. आदिवासी विकास, ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, शिक्षण व कृषी क्षेत्रात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. शेतकरी, कष्टकरी आणि वंचित घटकांच्या हितासाठी त्यांनी अखंडपणे कार्य केले. नंदुरबार जिल्ह्यासह उत्तर महाराष्ट्रातील आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासात त्यांचे योगदान मोलाचे राहिले आहे. साधी जीवनशैली आणि जनतेशी असलेली घट्ट नाळ यामुळे ते 'जनतेचे आमदार' म्हणून ओळखले जात होते. महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रातील एका अनुभवी, लोकाभिमुख आणि संवेदनशील नेत्याच्या जाण्याने एका युगाचा अंत झाला आहे. आदिवासी, ग्रामीण व वंचित घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी केलेले कार्य सदैव स्मरणात राहील, असे नमूद करत नाईक कुटुंबीयांना व कार्यकर्त्यांना या दुःखातून सावरण्याची शक्ती लाभो, अशी प्रार्थनाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली.

## संपादकीय...

# सत्ता डळमळली!

प्रकाश-सुजात आंबेडकरांचा उदय म्हणजे प्रस्थापित व्यवस्थेच्या छातीत बसलेला राजकीय स्फोट महाराष्ट्राच्या राजकारणात आज शांतता नाही भीती आहे. अस्वस्थता आहे. घाम फुटलेला आहे.

कारण ज्यांना वर्षानुवर्षे कडेला ठेवले, दुर्लक्षित केले, एकटे पाडले- तेच नेतृत्व आता सत्तेच्या मुळावर घाव घालत आहे.

१०५ नगरसेवक आणि ५ नगराध्यक्ष. हे आकडे लहान नाहीत- पण त्याहून मोठा आहे त्यामागचा राजकीय संदेश : वाभिमानाने लढलात, तर सत्ता हादरते.

या स्फोटाच्या केंद्रस्थानी आहेत प्रकाश आंबेडकर आणि सुजात आंबेडकर.

प्रकाश आंबेडकर : तडजोडीच्या दलालगिरीला दिलेला उघड नकार महाराष्ट्रात सत्ता मिळवायची असेल तर

विचारधारा सौद्याला काढा- हा अलिखित नियम झाला आहे.

पक्ष बदला, भूमिका बदला, समाज वापरा- आणि सत्तेच्या खुर्चीवर बसा.

प्रकाश आंबेडकरांनी हा नियम मोडला. त्यांनी स्पष्ट सांगितले- समाज विकून सत्ता नको.

त्याची किंमत त्यांनी मोजली. त्यांना एकटे पाडले गेले.

मीडियात दुर्लक्ष झाले.

राजकीय गणितांमधून काढून टाकले गेले. पण त्यांनी झुकणे नाकारले.

आज त्या हट्टाचा बदला मतपेटीतून घेतला गेला आहे.

सुजात आंबेडकर : गाजावाजा नाही, पण घातक संघटन

दुसरीकडे, सुजात आंबेडकर.कोणताही फोल आक्रमकपणा नाही.

कोणतीही सेलिब्रिटी पॉलिटिक्स नाही. पण जे आहे ते धोकादायक आहे- तळागाळात उभी राहिलेली संघटनशक्ती.

सुजात आंबेडकरांनी वंचितला पोस्टर-पॉलिटिक्समधून बाहेर काढले आणि प्रभाग, बूथ, वस्ती इथपर्यंत नेले.

हा विजय टीव्ही डिबेटचा नाही. हा विजय सोशल मीडियाच्या ट्रेंडचा नाही. हा विजय रस्त्यावर घाम गाळलेल्या कार्यकर्त्यांचा आहे.

प्रस्थापित पक्षांची धडधड का वाढली आहे? कारण आजवरचा खेळ उघडा पडला आहे. दलित-बहुजन-वंचित समाजाला फक्त मतपेटीपुरते आठवणारे पक्ष आता उघडे पडले आहेत.

निवडणुकीआधी जयभीम, सत्तेत गेल्यावर मौन- हा दुटप्पीपणा जनतेने ओळखला आहे.

जनतेचा आजचा सवाल सोपा आहे : तुम्ही आमच्यासाठी लढलात का? आणि उत्तर आहे- वंचित बहुजन आघाडी.

सत्ता, पैसा, यंत्रणा-सगळं असूनही भीती का? कारण सत्ताधाऱ्यांकडे सगळं आहे- पैसा आहे.

प्रशासन आहे. पोलीस आहे. मीडिया मॅनेजमेंट आहे.

पण एक गोष्ट नाही- लोकांचा आत्मा. तो आत्मा आता प्रश्र्न विचारतोय. तो आत्मा आता भीत नाही. आणि म्हणूनच प्रकाश-सुजात आंबेडकर प्रस्थापित व्यवस्थेला धोकादायक वाटतात. वंचितलाही इशारा : हा मोकळा चेक नाही हे यश साजरं करताना एक कटू सत्य विसरता येणार नाही.हा कौल अंधभक्तीचा नाही. हा सशर्त विश्र्वास आहे. जर सत्तेत गेल्यावर वंचितही तडजोडीच्या रस्त्याला लागली,

तर जनता तितक्याच निर्दयपणे खाली खेचेल.कारण आता मतदार बदलला आहे.तो जागा झाला आहे.तो गप्प बसणारा नाही.आजचा निष्कर्ष स्पष्ट आहे प्रकाश आणि सुजात आंबेडकर हे आता राजकारणातील पर्याय राहिलेले नाहीत. ते प्रस्थापित सत्तेसाठीथेट अस्तित्वाचा प्रश्र्न बनले आहेत.आणि म्हणूनच-हा निकाल विजय नाही.हा इशारा नाही.हा स्फोट आहे.

# जगात पुस्तक प्रेमी म्हणून ओळख असणाऱ्या आंबेडकरांनी मनुस्मृतीची जाहीरपणे होळी का केली?

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड सत्याग्रहा दरम्यान मनुस्मृतीची जाहीरपणे होळी केली होती,कारण या ग्रंथात जातीभेद आणि अस्पृश्यतेला समर्थन देणारे नियम होते.ही कृती सामाजिक विषमतेविरुद्धच्या लढ्याचा एक महत्त्वाचा भाग होती, ज्यात त्यांनी जातीभेदाचे समर्थन करणारी विचारधारा नाकारली आणि समान हक्कांसाठी लढा दिला.त्याच भारतीय समाजात मनुस्मुर्ती आजही जिवंत आहे.काही लोक आज ही विचार करतात बाबासाहेबांनी मनुस्मृतीचे दहन का केले?

जातीभेदाचा निषेध: मनुस्मृतीमध्ये जन्मावर आधारित वर्णव्यवस्था आणि जातीभेद यांना मान्यता दिली होती,ज्याचा डॉ.भिमराव आंबेडकर यांनी तीव्र विरोध केला होता.अस्पृश्यतेचा अंत: हा ग्रंथ अस्पृश्यतेला कायदेशीर आणि धार्मिक आधार देत होता, त्यामुळे आंबेडकर यांनी तो जाळून अस्पृश्यता नष्ट करण्याचा संकल्प जाहीर केला.समान हक्कांसाठी: त्यांना हिंदू समाजात सर्वांना समान अधिकार मिळावेत,ज्यात मंदिरे,विहिरी आणि शिक्षणाचे समान हक्क समाविष्ट होते,अशी त्यांची भूमिका होती.मनुस्मृती जाळणे हा मनुस्मृतीतील विचारांना आणि तत्कालीन ब्राह्मणी वर्चस्वाला विरोध दर्शवणारा एक क्रांतिकारक क्षण होता,

समतावादी विचारांचे भारतीय नागरिक २५ डिसेंबर १९२७ हा दिवस मनुस्मृती दहन दिन किंवा समानता दिन म्हणून साजरा करतात.या घटनेने आंबेडकरांना दलितांचे नेते म्हणून स्थापित केले आणि सामाजिक न्यायाच्या लढ्यात एक मैलाचा दगड ठरला.हे कृत्य 'मनुस्मृती' (मनुचे कायदे) या धार्मिक ग्रंथाच्या प्रती जाळून 'बहिष्कृत' (बहिष्कृत) आणि शोषित समाजावरील अत्याचाराचे प्रतीक म्हणून होते.आज राज्यात देशात मनुवादी विचाराचे लोक सत्ताधारी आहेत.लोकशाहीच्या चारी स्तंभावर त्यांची भक्कम पकड आहे. लोकशाहीची ताकद प्रत्येक स्तंभाच्या ताकदीवर आणि स्तंभ एकमेकांना कसे पूरक आहेत यावर अवलंबून असते.१) संसद म्हणजेच कायदेमंडळ,२) सरकार - कार्यकारी मंडळ,३) न्याय पालिका - न्यायालय,४) मीडिया किंवा प्रेस. वर्तमानपत्राला लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हटले जाते. मात्र ते खरे नसून लोकशाहीत फक्त,लोकसभा,न्यायपालिका व नोकरशाही हे तीनच स्तंभ मानले जातात. त्यामुळे ते लोकशाहीचे स्तंभ नसून राजकीय पक्षांचे आधारस्तंभ झाले आहेत.

टीव्ही वरील विविध मालिका पाहिल्यावर तुम्हाला वाटते काय मनुस्मृती संपली?. रंग माझा वेगळा ही मालिका काळया रंगाच्या स्त्रीवर आधारित आहे, त्यातील गोऱ्या रंगाची सौंदर्य इनामदार तिच्या जाती धर्माला शोभेल अशीच वागताना दाखविल्या जाते,मध्येच उच्चशिक्षित स्पेशेलिस्ट डॉक्टर मुलगी तनुजा मंत्री येते आणि काय काय करते,दिपाची आई व बहीण कोणत्या नीच पातळीवर कुटुंबात सतत कट कारस्थान करते.म्हणजेच रामायण महाभारतातील स्रियांच्या नायिका खलनायिकाची नव्याने ओळख निर्माण करून वर्णव्यवस्था आजच्या स्रियांवर लादण्यासाठी या मालिका आहेत काय?.

एका बाजूला स्त्री शिकली प्रगती झाली सांगायचे दुसरीकडे तिला देवा धर्माच्या जोखंडात बंदिस्त कशी राहील त्यांची व्यवस्था करावी तिच्याकडून रीतिरिवाजाच्या नांवा खाली उत्सव साजरा करून घ्यावे या मागचे षड्यंत्र बहुजन समाजातील महिलांनी समजून घेतले पाहिजे.असे असतांना त्याचं स्रिया जास्त संख्येने संध्याकाळी सात ते रात्री साडेनऊ पर्यत टीव्हीवरील मालिका लक्षपूर्वक पाहतात.भारतीय स्त्रीनां युगांयुगाच्या तरुंगात ठेवणारी व्यवस्था म्हणजे जातीव्यवस्था त्याची आचारसंहिता म्हणजे मनुस्मुर्ती होती आणि आज ही ती भारतीय समाजात मनुस्मृती जिवंत आहे.त्या नुसार स्रियांना आर्थिक अधिकार अथवा आर्थिक स्वत्रांत्य नाकारणारी व्यवस्था म्हणजेच मनुस्मुर्तीचे अलिखित कायदे होते.स्त्रीयाच्या सामाजिक श्रमावर पुरुषाची मालकी असावी असे ती सांगते होती. ज्या मनुस्मुर्ती उच्चजातीय स्त्रीला घराच्या बाहेर श्रम करण्यास नाकारत होती.तीच उच्चजातीय स्त्री आज सर्व ठिकाणी आघाडीवर दिसते.ज्या उच्चजातीय लोकांनी मनुस्मुर्तीचे समर्थन केले होते. तेच आज त्याचा जास्त लाभ घेताना दिसतात.

टीव्ही सीरियल प्रबोधन करणारी मालिका वरून विचारते आई कुठे काय करते?. मध्ये उच्चशिक्षित बापच बाहेर संजना सोबत ऑफिसच्या नांवावर शेण खातो, संजनाचे शेखरशी अधिकृतपणे लग्न होऊन मुलगा असतांना ही ती अनिरुद्ध बरोबर लग्न करण्यासाठी आटापिटा करते.या संघर्षातून कुटुंबात तयार होणारा मानसिक शारीरिक तणाव म्हणजेच काय संदेश देण्याचा उद्देश या मालिकेच्या दिग्दर्शकांचा असतो.

भारतात सर्व ठिकाणी महिलांचे आजचे स्थान पहिले तर मनुस्मुर्ती जिवंत नाही.असे वाटते. पण बहुजन समाजांच्या घराघरातील व्यवहार सण,उत्सव डोळसपणे पाहिल्यास महिलांचे धार्मिक सन उपास तापास आणि मंदिरातील बहुजन समाजांच्या महिलांची उपस्थती पाहिली कि मनुस्मुर्ती जिवंत आहे हे स्पष्ट दिसते.

महिलांची शिक्षणातील आणि नोकरी धंद्यातील प्रगती पाहली तर मनुस्मुर्ती जिवंत नाही असे वाटते.पण जेव्हा बँका,सरकारी कार्यालय, रेल्वे. शाळा कॉलेज मधील सुशिक्षित महिलांना नवरात्रात नऊ दिवस नऊ रंगात पाहल्या जातात तेव्हा मनुस्मुर्ती जिवंत दिसते.सिनेमा, नाटक,टिव्ही मालिका मध्ये जेव्हा महिला नायिका, खलनायिका पाहल्या जातात तेव्हा महिलांनी मनुस्मुर्ती नाकारलेली दिसते.पण जेव्हा देवाच्या आशीर्वादाने मुल झाले किंवा प्रगती झाली,संकट टळले हे दाखविल्या जाते तेव्हा मनुस्मुर्ती महिलाच्या मेंदूत कायम कोरली आहे हे दिसते.सुख म्हणजे नक्की काय असते?. असे विचारणारी आणखी एक टीव्ही सिरीयल मालिका त्यामध्ये शालिनी,देवकी, कोण कोणते कारस्थान करून गौरीला कलंकित करण्याचा प्रयत्न करतात,जोतिकाला जयदीप आवडतो आणि जय दीप गौरीचा बालपणाचा मित्र आहे,त्यात जिव्हाळा आपुलकी प्रेम आहे असे दाखवते, माईसाहेब दादासाहेब यांचा फक्त नांवाला दरारा असतो. घरातील नीच पातळीवरील कटकारस्थानाची त्यांना कल्पनास नसते म्हणजेच वडीलधाऱ्यांना या मालिका मूर्खात काढून महिलांना कोणती प्रेरणा देणाऱ्या आहेत.पहिल्या सारखी कडक मनुस्मुर्ती आज कुठे आहे असे म्हणणारे लोकच अशा वेगवेगळ्या मालिका जिवंत करून मनुस्मृती आचार संहिता कायम स्त्रीयाच्या मेंदूत राहण्याचे काम अनेक प्रकारे करीत असतात.

ब्राह्मणी साहित्यिक विचारवंत कसे बेमालूम पद्धती त्यांचे कलम कसाई कौशल्य वापरतात याचे ठळक नांवे नरहर कुरुंदकरांच्या मनुस्मुर्ती : काही विचार या पुस्तकाचे परीक्षण कॉम्रेड शरद पाटील यांनी केले त्यावेळी त्यांनी या सर्व बुद्धी प्रामाण्यवादी ब्राह्मणाची यादीच दिली आहे. (संदर्भ सत्यशोधक मार्क्सवादी जुले ऑगस्ट १९८३) आंबेडकरी चळवळीतील लोक वगळता इतर मराठा,ओबीसी मागासवर्गीय बहुजन समाज मनुस्मुर्तीच्या चौकटीत बंधिस्त आहे.मराठा,ओबीसी बहुजन समाज किंवा इतर पुरोगामी संस्था संघटना पक्ष २५ डिसेंबर मनुस्मुर्ती दहन दिन साजरा करीत नाही.काही जयभिम कॉमरेड असलेले कार्यकर्ते त्यात हिरीरीने भाग घेतात.

२५ डिसेबर भारतीय महिला दिवस म्हणून जाहिर व्हावा अशी मांगणी १९९६ साला पासुन केली जाऊ लागली डॉ प्रमिला संपत यांनी पुढाकार घेउन सर्व प्रथम चंद्रपुरच्या दीक्षाभूमीवर विकास वंचित दलित राष्ट्रीय महिला परिषद झाली होती. त्यात ही मांगणी झाली त्या नंतर बाळासाहेब (प्रकाश) आंबेडकर प्रणित संस्था संघटना करीत आहेत त्याला पुढे रिपब्लिकन महिला आघाडी ने २५ डिसेंबर हा भारतीय स्त्रीमुक्ति दिन म्हणून जाहिर व्हावा अशी मांगणी केली होती.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे सत्याग्रह केला होता.त्यात मनुस्मुर्ती,श्रुती स्मृती,पुरणाला स्पष्ट नाकारून त्याचे दहन करण्याचा ठराव करण्यात आला होता. हा ठराव विनायक सहस्त्रबुद्धे यांनी मांडला आणि राजभोज यांनी त्याला पांठिबा दिला. मनुस्मुर्ती दहनाचा ठराव झाल्या नंतर रात्री नऊ वाजता एका खड्ड्यात अस्पुश्य बैराग्याच्या हस्ते मनुस्मुर्तीची जाहीर होळी करण्यात आली. या महाड च्या सत्याग्रह यशस्वी करण्यात ज्यांनी जीवापार मेहनत घेतली ते सर्व शांताराम पोतनीस,केशवराव देशपांडे,रा.वामनराव पत्की,कमलाकर टिपणीस, पुण्यावरून सुभेदार घाडगे,रा.थोरात.ही मंडळी होती या सर्व बाबासाहेबाच्या सच्च्या अनुयानी त्याचे जोरदार समर्थन केले म्हणून यांच्या स्रिया शिक्षण नोकरीत सर्व ठिकाणी आघाडीवर आहेत पण त्या आज मनुस्मुर्ती चे दहन दिन साजरा करीत नाही. सर्व ठिकाणी मनु ने नकारलेले अधिकार घेतात आणि योग्य ठिकाणी मनुस्मुर्तीच्या इतर धार्मिक कायदे कलमाचा काटेकोर अंमल करतात. त्यामुलेच भारतात मनुवादी संघटना पक्ष वाढत आहेत. बाबासाहेब यांनी मनुस्मुर्तीचे जाहिर दहन केले होते ते केवळ महिलाच्या मुक्तिसाठी आज महिला मुक्त आहेत पण डॉ.बाबासाहेब आंबेडकर याचे ते अभ्यासपूर्ण परिश्रम आणि त्याची अंमलबजावणी करीता केलेला संघर्ष महिला विसरल्या आहेत. बहुजन समाजातील लोक किती ही फुले,शाहु,आंबेडकर यांची नांवे घेऊन जयजयकार करीत असली तरी त्यांनी खरी विचारधारा स्विकारली नाही. हे त्यांच्या आचरणातून दिसून येत आहे.मराठा ओबीसी मागासवर्गीय एकूण बहुजन समाज म्हणजे ८५ टक्के मागासवर्गीय समाज जो विविध जाती आणि पोट जातीत विखुरला आहे. तो सुशिक्षित होऊन पुढे गेला असे दिसत असले तरी त्यांचावर हजारो वर्षाचे बंदीस्त करणारे संस्कार तो विसरायला तर नाही. विज्ञानाने किती प्रगती केली असली तरी तो स्वतःला त्या बंधनातून मुक्त भरारी घेण्यास तयार नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ती २५ डिसेंबर १९२७ ला महाड येथे जाहीर पणे होळी करून मनुस्मृती जाळली असली तरी २०१७ मध्ये तिची नवीन मराठी आवर्ती पेशवा सरकारच्या आशीर्वादाने बाजारात खुले आम विकली गेली.आणि ते घेणारे बहुसंख्य बहुजन मागासवर्गीय समाजातील सर्व प्रकारचे लोक होते.त्याला पुरोगामी समाजवादी, राष्ट्रवादी यांनी दाखविण्या पुरता विरोध केला. त्यात आंबेडकरी चळवळीतील सुशिक्षित लोक पण मागे नाहीत.ते मनुस्मुर्ती माहिती करीता,अभ्यास करण्यासाठी विकत घेतात.डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी ती जाळली म्हणजे ती बहुजनांच्या विकास, कल्याण,अधिकार नाकरणारी होती म्हणुन जाळलीनां. मग आपण बाबासाहेबांनी लिहलेल वाचले पाहिजे.म्हणजे आपणास योग्य दिशा मिळेल.म्हणूनच बहुजन समाजातील सर्व मागासवर्गीय जातीजमातील सर्व पुरुष महिलानी मनुस्मुर्ती दहन का केले यांचा इतिहास वाचावा तर खऱ्या अर्थाने स्त्री मुक्ती होईल.

टीव्ही चॅनलवर असा मालिका येणार नाहीत. तर सहकुटुंब सहपरिवार,फुलाला सुंगन्ध मातीचा, मुलगी झाली हो!. यासर्व मालिकांनी बहुसंख्य महिलांना मोहित करून ठेवले.बॉब कट केस ठेऊन,जीन पॅन्ट टी शर्ट घातले म्हणजे स्त्री मुक्त आहे असे समजणे मूर्खपणाचे लक्षण आहे. आज सर्व क्षेत्रात मुक्तपणे ती नोकरी,धंदा,कला कौशल्य दाखवीत असली तरी ती लैंगिक,मानसिक,आर्थिक दृष्ट्या धर्म संस्काराच्या बाहेर जात नाही. गुरुवार शुक्रवार सह सर्व रिती रिवाज योग्य वेळी काटेकोर पणे त्यांचे पालन करते म्हणुन तीला,बॉब कट,जीन पॅन्ट टी शर्ट घालण्याची विशेष सवलत मिळते आहे. म्हणुन ती मोठ्या प्रमाणात मनुस्मुर्ती दहन दिन साजरा करीत नाही.बहुजन समाजात मागासवर्गीय जाती जमातीत वैचारिक प्रबोधन होणे गरजेचे आहे.म्हणुन बहुजन समाजात मनुस्मुर्ती आज भी जिवंत आहे.मराठा समाजात मराठा सेवा संघाने प्रचंड वैचारिक प्रबोधन केले.मग त्यांच्या महिला मनुस्मुर्ती दहन कार्यक्रम घेतात का?. ( माफ करा या बाबत मला माहिती नाही,कधी वाचले,आणि पाहिले नाही ) मग कोणत्या स्त्रीया त्यांच्या संघटना मनुस्मुर्ती दहन दिवस साजरा करतात?. सर्वच भारतीय समाजातील स्त्रीयांनी मनुस्मुर्ती दहन दिन म्हणून साजरा करायला पाहिजे. तरचं ती वैचारिक दृष्ट्या संपेल. अन्यता ती केवळ बहुजन समजतच नाही तर सर्व भारतीय समाजात जिवंत राहील. आणि प्रज्ञा ठाकूर,साध्वी असूनही खासदार बनून संसद भवनात जाईल. मनुवादी मनुस्मृती वर्णव्यवस्था किती महत्वपूर्ण होती हे सांगेल.जगात पुस्तक प्रेमी म्हणून ओळख असणाऱ्या आंबेडकरांनी मनुस्मृतीची जाहीरपणे होळी का केली?.ही सांगेल काय ????.

**सागर रामभाऊ तायडे**
**,९९२०४०३८५९ भांडुप मुंबई.**

# एक दिवस भीमा कोरेगाव विजयस्तंभाला मानवंदना देणार!. आणि वर्षभर त्याकडे दुर्लक्ष करणार ?.

भीमा कोरेगाव विजयस्तंभ व विजयतंभ परिसरातील पावणे दहा एकर जागेवर माळवदकर कुटुंबाचा ताबा आहे.सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने प्रत्येक वर्षी मुंबई उच्च न्यायालयाची परवानगी घ्यावी लागते.किती लोकांना हे माहित आहे??? ९९.९९% लोकांना माहित नाही व ज्यांना माहिती आहे ते मौन धारण करेन गप्प बसले आहेत त्यांना कुणाची भीती आहे ते माहित नाही.

केवळ एक दिवस परवानगी मिळते व पुन्हा विजयस्तंभासह जागेचा ताबा माळवदकर कुटुंबाकडे जातो. वर्षभर हे कुटुंब जमिनीच्या मधून शेतीचे उत्पन्न घेते.या विरोधात मागील पंधरा वर्षे प्रशासकीय व न्यायालयीन लढा माझ्या नेतृत्वाखाली भीमा कोरेगाव विजयस्तंभ संरक्षण व संवर्धन समिती लढत असून अनेक निकाल या समितीच्या बाजूने लागले आहेत.अनेक वेळा या न्यायालयीन लढ्यात सामील व्हा असे आवाहन केले तर त्याकडे कोण लक्ष देत नाही.

लाखों लोक एक दिवस या विजयस्तंभाला मानवंदना देण्यासाठी येतात आणि नंतर ऐतिहासिक विजयस्तंभाकडे दुर्लक्ष करतात.हा विजयस्तंभ व त्या परिसरातील जागा आपल्याला जर ताब्यात घ्यायची असेल तर प्रशासकीय व न्यायालयीन लढा सर्वांनी सर्व मतभेद बाजूला ठेवून एकत्रितपणे लढला पाहिजे व यासाठी आपण भीमा कोरेगाव विजयस्तंभाचे अतिक्रमण तसेच सध्याची न्यायालय स्थिती काय आहे हे तालुक्यात, शहरात आणि



Dr.Ambedkar with Mahar Regiment on his birthday - 1950

प्रत्येक जिल्ह्यात समजून घेतलं पाहिजे आणि म्हणून यासाठी कोरेगाव भीमा जयस्तंभ बचाव समिती या समितीच्या माध्यमातून जनजागृती अभियान राबवत असून हा लढा समजून घ्या.

कोरेगाव भीमा जयस्तंभ बचाव समितीच्या प्रत्येक तालुक्यात,जिल्ह्यात व प्रत्येक शहरात कार्यकारिणी बनवा महत्वाची जबाबदारी घ्या आणि प्रत्यक्ष फिल्डवर लढण्यासाठी सज्ज व्हा. जनजागृती अभियान तालुक्यात,शहरात,जिल्ह्यात राबवा ही सध्या काळाची गरज आहे.आपले नाव,तालुका व जिल्हा ९७०२८४५००० या ुहर्ी ी र्ि निंबरवर पाठवा.केवळ एक दिवस भीमा कोरेगाव विजयस्तंभाला मानवंदना आपण देणार आणि वर्षभर त्याकडे दुर्लक्ष करणार ही अत्यंत वेदनादायक बाब आहे.

भीमा कोरेगाव एक जानेवारीला आपण येतो ते पण मुंबई उच्च न्यायालयाची परवानगी मिळाली म्हणून पण ३६४ दिवस भीमा कोरेगाव विजयस्तंभ कुणाच्या ताब्यात असतो ते माहीत आहे का?????. एक दिवस येतात पण ३६४ दिवस काय करतात???. मग साथ देणार का????.

की फक्त १ दिवस चलो भीमा कोरेगाव...नंतर २ जानेवारी पासून???

**दादाभाऊ अभंग ९७०२८४५०००,मुंबई.**
**अध्यक्ष भीमा कोरेगाव विजय स्तंभ संरक्षण व संवर्धन समिती व कोरेगाव भीमा जयस्तंभ बचाव समिती**

# प्रेमाचा उत्सव की औपचारिक सोहळा : ख्रिसमस आणि हरवत चाललेली माणुसकी

गोठ्यात जन्मलेला आशेचा दिवा आज बाजारात हरवतो आहे का? जगाच्या इतिहासात काही जन्म असे असतात, जे कॅलेंडरवर नोंदले जात नाहीत; ते माणसाच्या अंतःकरणावर कोरले जातात. येशू ख्रिस्तांचा जन्म असाच एक क्षण होता. राजवाड्यात नव्हे, तर एका साध्या गोठ्यात; सोन्याच्या पाळण्यात नव्हे, तर गवताच्या कुडीत जन्मलेला हा बालक पुढे संपूर्ण मानवजातीसाठी प्रेम, क्षमा आणि त्यागाचा महामार्ग दाखवेल, याची कुणालाच कल्पना नव्हती. आज दोन हजार वर्षांनंतरही ख्रिसमस हा केवळ ख्रिस्ती समाजाचा सण न राहता तो संपूर्ण मानवतेचा उत्सव बनला आहे–किमान तसा तो असायला हवा. येशू ख्रिस्तांचा जन्म हा केवळ धार्मिक घटना नव्हती; ती सामाजिक क्रांतीची सुरुवात होती. त्या काळातील समाज अन्याय, दास्य, सत्तेचा उन्माद आणि धार्मिक नावावर होणाऱ्या शोषणाने ग्रासलेला होता. अशा काळात येशूंनी दिलेला संदेश साधा होता एकमेकांवर प्रेम करा. पण हा साधा संदेशच सत्ताधाऱ्यांना आणि धर्मठेकेदारांना अस्वस्थ करणारा ठरला.

येशूंनी मंदिरांतील दिखाऊ भक्तीपेक्षा रस्त्यावरील उपाशी माणसाला महत्त्व दिले. त्यांनी पापी म्हणून हिणवलेल्यांना जवळ केले, आजारी, गरीब आणि उपेक्षितांच्या पाठीशी उभे राहिले. म्हणूनच ख्रिसमस हा केवळ आनंदाचा सण नाही; तो वंचितांच्या बाजूने उभे राहण्याची आठवण करून देणारा दिवस आहे. आजचा ख्रिसमस, झगमगाट आणि वास्तव आहे, मात्र प्रश्न विचारायला भाग पाडतो. दिवे लागतात, केक कापले जातात, शुभेच्छांचा वर्षाव होतो; पण रस्त्यावरील अंधार कमी होतो का? गोठ्यात जन्मलेल्या येशूंचा सण आपण मॉलमध्ये साजरा करतो, ही विसंगती खटकणारी आहे. भेटवस्तूंच्या स्पर्धेतून ख्रिसमस हळूहळू ग्राहकवादाचा उत्सव बनतो आहे. 'मेरी ख्रिसमस' म्हणतांना आपण समोरच्याच्या दुःखाकडे पाहतो का, हा खरा प्रश्न आहे. आज जग युद्धांनी, द्वेषाने, धार्मिक असहिष्णुतेने आणि सामाजिक दरीने फाटलेले असताना ख्रिसमसचा खरा अर्थ अधिकच महत्त्वाचा ठरतो.

येशू ख्रिस्तांचे संपूर्ण जीवनच क्षमेची ताकद आणि त्यागाचे प्रतीक होते. क्रूसावर चढवले जात असतानाही त्यांनी शत्रूंना क्षमा केली, हे पिता, त्यांना माफ कर, कारण ते काय करीत आहेत हे त्यांना माहीत नाही. क्षमा ही कमजोरी नाही, तर ती माणसाला माणूस बनवणारी सर्वात मोठी



ताकद आहे, हे येशूंनी कृतीतून दाखवले. आज सूड, द्वेष आणि प्रतिशोधाच्या मानसिकतेत जग अडकले असताना क्षमेचा हा संदेश अधिकच क्रांतिकारी वाटतो. ख्रिसमस म्हणजे फक्त आनंद नव्हे; तो स्वतःच्या अहंकाराचा क्रूस उचलून तो खाली ठेवण्याचा दिवस आहे. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात ख्रिसमसचे महत्त्व अधिक व्यापक आहे. हा सण आपल्याला सांगतो की धर्म वेगळे असू शकतात, पण माणुसकी एकच असते. येशूंनी कधीही धर्माच्या भिंती उभ्या केल्या नाहीत; त्या आपण उभ्या केल्या. म्हणूनच ख्रिसमस हा धार्मिक सहअस्तित्वाचा, संवादाचा आणि सद्भावनेचा उत्सव आहे. आज जेव्हा सणांनाही धार्मिक ओळखींच्या चौकटीत अडकवले जाते, तेव्हा ख्रिसमसचा सार्वत्रिक संदेश जपणे ही सामाजिक जबाबदारी ठरते. प्रेम, शांतता आणि बंधुता ही मूल्ये कुठल्याही धर्माची मक्तेदारी नाहीत.

गरीबांचा ख्रिसमस कुठे आहे? खरा ख्रिसमस चर्चमध्ये नाही, तर झोपडपट्टीत आहे. तो रुग्णालयातील खाटेवर आहे, उपाशी मुलांच्या डोळ्यांत आहे, एकाकी वृद्धांच्या शांत अश्रूंमध्ये आहे. येशू तिथेच सापडतात, कारण त्यांनी स्वतः तसाच मार्ग निवडला होता. आज आपण ख्रिसमस साजरा करतांना एखाद्या गरजूला हात दिला, एखाद्याचे दुःख हलके केले, तरच त्या उत्सवाला अर्थ उरतो. अन्यथा तो केवळ कॅलेंडरवरील एक दिवस ठरतो. ख्रिसमस हा एका दिवसाचा कार्यक्रम नसून ३६५ दिवसांचा संकल्प आहे. प्रेम करणे सोपे नाही, क्षमा करणे कठीण आहे; पण समाज वाचवायचा असेल, तर हा मार्गच निवडावा लागेल. येशूंनी दिलेला मार्ग हा संघर्षाचा होता, पण तोच मानवतेचा एकमेव मार्ग आहे. आज जेव्हा जगाला शांततेची सर्वाधिक गरज आहे, तेव्हा ख्रिसमसचा संदेश केवळ शुभेच्छांपुरता मर्यादित ठेवणे हा येशूंवर अन्याय ठरेल. गोठ्यातील संदेश आजही जिवंत आहे.

गोठ्यात जन्मलेला तो बालक आजही आपल्याला विचारतो,
तुम्ही दिवे लावले, पण अंधार दूर केला का?
तुम्ही केक कापला, पण भुकेल्याला अन्न दिले का?
तुम्ही प्रार्थना केली, पण माणसावर प्रेम केले का?

**प्रविण वाघडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

## तांबवा येथील गणपतराव चाटे यांचा देह स्वामी रामानंद तीर्थ येथे देहदाण करून केला नवा उपक्रम!



केज/प्रतिनिधी– केज तालुक्यातील तांबवा येथील गणपतराव यशवंतराव चाटे यांनी आपल्या मरणानंतर आपला देहदान करण्याची इच्छा जिवंत असताना प्रगट केली होती. ती म्हणजे माझ्या मृत्यूनंतर माझ्या देहाला अग्नी दहन किंवा दफन न करता माझा देह समाज उपयोगी कार्यास लागावा. या उद्देशाने गणपतराव संपतराव चाटे यांचा देह अंबाजोगाई येथील स्वा.रा.ति. मेडिकल कॉलेज आंबेजोगाई येथील मेडिकलच्या विविध रोगावर संशोधन करण्यासाठी आंबेजोगाई कडे घेऊन जाणार असल्याचे समजताच तांबवा येथील ग्रामस्थ व नातेवाईक, आप्तेष्ट मंडळी यांनी केज शहरातील जय भवानी चौक येथे एकच गर्दी केली होती.

केज मध्ये गणपतराव चाटे यांचे पार्थिव घेऊन जाणारी रुग्णवाहिका येताच ग्रामस्थांनी गणपतराव चाटे यांच्या पार्थिवाचे दर्शन घेऊन भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून अखेरचा निरोप दिला. यावेळी आनंद ग्रामचे प्रमुख दत्तात्रय बारगजे यांनी गणपतराव चाटे यांनी आपल्या जीवनात एचआयव्हीग्रस्तांची तसेच गोमातेची सेवा केली. व अखेरचा श्वासही आनंद ग्राम या ठिकाणी घेतला अशा प्रतिक्रिया आमच्या प्रतिनिधीशी बोलताना बारगजे यांनी दिल्या. यावेळी केज तालुक्यातील व तांबवा गावातील नागरिकांनी गणपतराव चाटे यांना अखेरचा निरोप दिला. ते आनंदग्राम येथील गोशाळेत कार्यरत होते. आम्हा सर्वांच्या समुपदेशन समजुतीने नातेवाईक कुटुंबीय देहदान करण्यास तयार झाले. दादांनी १५ वर्षे गायींची सेवा केली, परंतु हायवेवरून रस्ता ओलांडत असताना त्यांचा अपघात झाला. अन ते तब्बल चार महिने बेडवर होते, ना बीपी ना शुगर असा हा देह... मरणोत्तरही कामी यावा हाच त्यामागील उद्देश! यासाठी वैद्यकीय महाविद्यालय अंबाजोगाई येथे सर्व प्रकिया पुर्ण करुन सदरचा देह एचआयव्ही बाधित नाही. म्हणुन... देत आहोत. अशी माहिती आनंदग्रामचे संस्थापक दत्तात्रय बारगजे यांनी दिली आहे.

## यशवंतराव चव्हाण शाळेत राष्ट्र सेवा दला तर्फे साने गुरुजची १२६ वी जयंती उत्साहात साजरी

लातूर : लातूर येथील यशवंतराव चव्हाण प्राथमिक शाळेत राष्ट्र सेवा दललातूर




शाखेच्या वतीने पूज्यनीय साने गुरुजी यांची १२६ वी जयंती मोठ्याउत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी राष्ट्र सेवा दलाचे लातूर जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे यांचीप्रमुख उपस्थिती होती. यावेळी पांडुरंग देडे यांनी साने गुरुजी यांच्याजीवन कार्यावर मार्गदर्शन केले. शिक्षक बालाजी गंथडे यांनी ' खरा तोएकची धर्म जगाला प्रेम अर्पावे' हे साने गुरुजींनी लिहिलेले गीतमुलांसमवेत गायीले. सर्व शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थ्यांनी सानेगुरुजींच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळीमुख्याध्यापिका पुष्पा जाधव, सहशिक्षक संगीता भालेकर, बालाजी गंथडे,माधुरी सूर्यवंशी, चांगदेव कोळी, सोमनाथ महांडुळे आदीसह विद्यार्थ्यांचीमोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# धर्माच्या पलीकडे उभा असलेला गुरुनानक : माणुसकीचा जाहीरनामा

नानक या नावाचा अर्थ आहे, जो एकाग्र आहे, एक देव पाहतो आणि त्यावर विश्वास ठेवतो आणि द्वैत पाहत नाही. इतिहास साक्ष देतो की जेव्हा धर्म माणसांना जोडण्याऐवजी तोडू लागतो, जेव्हा ईश्वराचे नाव घेऊन माणसावर अन्याय होतो आणि जेव्हा सत्ता व अहंकार मानवतेवर कुरघोडी करतात–तेव्हाच गुरुनानक देवांसारखा महामानव जन्माला येतो. पंधराव्या शतकातील सामाजिक, धार्मिक आणि राजकीय अराजकतेत गुरुनानक देवांनी जे विचार मांडले, ते त्या काळासाठीच नव्हे तर आजच्या सत्ता, पाखंड आणि द्वेषाच्या काळासाठीही सत्ताधाऱ्यांना आणि धर्मठेकेदारांना अस्वस्थ करणारे आहेत. १४६९ साली तलवंडी येथे जन्मलेल्या गुरुनानक देवांचे पहिलेच विधान एक ओंकार हे निव्वळ धार्मिक तत्त्वज्ञान नव्हते, तर तत्कालीन समाजरचनेवर केलेला थेट हल्ला होता. ईश्वर एक आहे ही श्रद्धा नाही, ही बंडखोरी आहे. जर ईश्वर एकच असेल, तर जात कशी? धर्म कसा? उच्च-नीचतेचा अधिकार कोणाला? गुरुनानकांनी प्रश्न विचारले; आणि प्रश्न विचारणे हीच खरी क्रांती असते.

आजही समाज प्रश्न विचारण्याऐवजी आंधळे अनुकरण करतो. गुरुनानकांनी मात्र कर्मकांड, तीर्थयात्रा, उपास-तापास आणि दिखाऊ भक्ती यांना निर्भीडपणे नाकारले. त्यांनी सांगितले–ईश्वर बाहेर शोधू नका, तो तुमच्या कृतीत आहे. प्रामाणिक श्रम, सत्य वागणूक आणि करुणा हाच खरा धर्म. गुरुनानक देवांच्या विचारांचा सर्वात मोठा धोका म्हणजे जात, धर्म आणि लिंगभेदावर गुरुनानकांचा थेट वार ते विषमतेच्या मुळावर घाव घालतात. जिच्यापासून राजा जन्माला येतो, तिला कमी लेखायचे कसे? असा प्रश्न त्यांनी स्त्रीविषयक मानसिकतेला विचारला. पंधराव्या शतकात स्त्रीसमतेची अशी ठाम भूमिका घेणे म्हणजे सामाजिक बंडच होते.

आजही स्त्री, दलित, अल्पसंख्याक यांच्याविषयी बोलताना समाज गप्प बसतो. गुरुनानक मात्र गप्प बसले नाहीत. त्यांनी धर्माच्या नावावर चालणारी माणसामाणसातील दरी ठामपणे नाकारली. म्हणूनच गुरुनानक हे केवळ शीख धर्माचे संस्थापक नसून समतेच्या विचारांचे जागतिक प्रवर्तक आहेत. गुरुनानक देवांनी भारतभर नव्हे तर मध्य आशिया, अरब देशांपर्यंत प्रवास केला. उदासी यात्रांमधून संवाद, संघर्ष आणि समन्वय, हिंदू-मुस्लिम संवाद साधला, मौलवींना प्रश्न विचारले, पंडितांच्या पाखंडाला आव्हान दिले. त्यांनी कुठेही तलवार उचलली नाही, पण शब्दांनी सत्ता हादरवली. आज जे संवादाच्या नावावर द्वेष पसरवले जातात, त्याच्या नेमक्या उलट गुरुनानकांचा मार्ग होता–संवादातून समन्वय.

गुरुनानक देवांची लंगर परंपरा ही भूक भागवणारी नाही, व्यवस्था बदलणारी क्रांती जगातील सर्वांत मोठी आणि शांत सामाजिक क्रांती आहे. एकाच पंक्तीत बसून राजा आणि रंक, सवर्ण आणि दलित, हिंदू आणि मुसलमान जेवतात–याहून मोठा समतेचा धडा कोणता? आजही गुरुद्वाऱ्यातील लंगर हा मानवतेचा जिवंत घोष आहे. आजच्या काळात जेव्हा गरीबांसाठी योजना फक्त कागदावर असतात, तेव्हा लंगर कृतीतून बोलतो. गुरुनानकांनी केवळ भाषण दिले नाही; त्यांनी व्यवस्था उभी केली. आज गुरुनानक असते तर, आजचा समाज धर्मांधतेने ग्रासलेला आहे. धर्म म्हणजे श्रद्धा न राहता राजकारण झाले आहे. देवाच्या नावावर दंगली, द्वेष, बहिष्कार होत आहेत. अशा काळात गुरुनानक देव असते तर त्यांनी स्पष्ट सांगितले असते–धर्म माणसासाठी आहे, माणूस धर्मासाठी नाही.

गुरुनानक यांनी अनेक ठिकाणी संगत (धर्मशाळा) आणि पंगत (लंगर) सुरुवात केली. आजही संगत व पंगत मुळे गुरुनानकांचे अनुयायी प्रत्येक दिवशी एकत्र येतात आणि सबद–किर्तन करतात नानकदेव आपल्या गुरवाणीत म्हणतात की, 'नानक उत्तम निच न कोई' आपण ईश्वराच्या नजरेत सर्व समान आहोत कारण मानव जात एक आहे. तो खालच्या जातीचा, मी उच्च जातीचा हा भेद नष्ट करण्याचा प्रयत्न केला. जात–पात नष्ट करण्यासाठी त्यांनी जो गुरु (लंगर) चा निशुल्क पायंडा पाडला तो वाखण्याजोगा आहे. आम्ही सर्व ईश्वरांची लेकरे आहोत हा अविभाव त्यांनी (लंगर) च्या रुपाने मग तो गरीब असो की श्रीमंत त्यांनी एकाच पंगतीमध्ये बसण्यास सर्वांना भाग पाडले. आजही ही प्रथा अखंड पणे गुरुद्वाराम्ध्ये राबविली जाते या पासुन प्रत्येक मानवाने बोध घेतला पाहिजे. गुरूनानक यांनी कधीही 'देवांच्या ट्रिनिटी' वर विश्वास ठेवला नाही किंवा देव मानवी स्वरूपात जन्माला येऊ शकतो यावर विश्वास ठेवला नाही. शीख धर्मात त्यांनी हिंदू आणि इस्लाम या दोन्ही धर्माचा मेळ साधण्याचा प्रयत्न केला. अंधश्रद्धा, जातीभेद, कर्मकांड यावर त्यांचा कधीच विश्वास नव्हता. त्यांचे शब्द श्री गुरु ग्रंथ साहिब, पवित्र शास्त्रात समाविष्ट आहेत.

आज गुरुनानकांचे विचार सत्तेला अस्वस्थ करतात, कारण ते प्रश्न विचारायला शिकवतात. ते अंधश्रद्धेला आव्हान देतात. ते श्रमाला प्रतिष्ठा देतात. म्हणूनच गुरुनानक देव केवळ जयंतीपुरते स्मरणात ठेवण्याचे नव्हेत; ते रोजच्या आचरणात उतरवण्याचे आहेत. गुरुनानक देव हे इतिहासात अडकलेले संत नाहीत. ते वर्तमानाला आरसा दाखवणारे आणि भविष्याचा मार्ग दाखवणारे विचारवंत आहेत. आज जर समाजात शांतता, समता आणि बंधुता हवी असेल, तर गुरुनानकांचा विचार स्वीकारल्याशिवाय पर्याय नाही. गुरुनानक जयंती म्हणजे फक्त प्रकाशोत्सव नव्हे; ती आत्मपरीक्षणाची संधी आहे. आपण माणूस म्हणून किती प्रामाणिक आहोत, हे तपासण्याची संधी.

शीख एक देव, निर्माता आणि सर्व मानवजातीच्या समानतेवर विश्वास ठेवतात. गुरूनानक यांनी शिखांना कौटुंबिक जीवन जगायला शिकवले आणि तीन पटीचे बोधवाक्य पाळले ज्यामुळे त्यांना दैनंदिन जीवनात आणि त्यामध्ये देवाशी जोडण्यास मदत झाली: नाम जपो – प्रार्थना करा आणि देवाचे स्मरण करा. किरत करो – प्रामाणिक जीवन जगा. देशातील जेवढे संत होऊन गेलेत त्यांनी तथागत भगवान बुध्दांनी सांगितलेल्या मार्गाचा अवलंब केल्याचे आम्हाला आढळून येईल. कोणताही संत बघा, कित्येक वर्षापूर्वी तथागतांनी सांगितलेल्या उपदेशाचा प्रचार या देशातील संतांनी आपापल्या परिने केले हे नाकारून चालणार नाही. भारतीय अध्यात्मिक शिक्षक जे शीख धर्माचे पहिले गुरू गुरुनानक होते, एकेश्वरवादी धर्म हिंदू आणि मुस्लिम प्रभाव एकत्र करतो. अशा सत्याचा मार्ग दाखविणाऱ्या महान सतिगुरु श्री गुरुनानकदेवजींचा जन्म कार्तिक पौर्णिमा आणि गुरुनानक जयंती दिनी १५ एप्रिल १४६९ ला श्री नानकाना साहिब येथे आई तृप्ता देवी आणि वडील कालू खत्री यांच्या घरी झाला. ज्याला गुरुनानकचा प्रकाश उत्सव आणि गुरुनानकदेवजी जयंती असेही म्हणतात. एकता, श्रध्दा आणि प्रेमाचा संदेश देणारे शिख धर्माचे संस्थापक गुरुनानकददेव यांच्या जयंती निमित्त त्यांना शत: शत प्रणाम !

**वाहेगुरु जी का खालसा वाहे गुरु जी की फतेह।**

**सर्व शीख बांधवाना गुरुनानक जयंती च्या खूप खूप शुभेच्छा !**

**प्रविण वाघडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

## आदर्श विद्यालयात वर्ग ग्रंथालयाचे उत्साहात उद्घाटन

केज/प्रतिनिधी-केज तालुक्यातील बनसारोळा येथील आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात वर्ग सातवीत अ च्या ग्रंथालयाचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका श्रीमती सिंधुताई चव्हाण होत्या, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राध्यापक साळुंके सर यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक रोकडे एस.व्ही. यांनी केले. या उपक्रमांतर्गत वर्ग सातवी 'अ'च्या विद्यार्थ्यांनी विविध मान्यवर लेखकांची पुस्तके स्वखर्चाने जमा करून वाचन संस्कृतीला चालना दिली आहे. वर्ग ग्रंथालयाची जबाबदारी ग्रंथपाल म्हणून सोफियान पठाण यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.




उद्घाटनाच्या पहिल्याच दिवशी सर्व पुस्तकांचे वाटप विद्यार्थ्यांना करण्यात आले.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना प्राध्यापक साळुंके सर म्हणाले की, पुस्तक वाचन हे विज्ञाननिष्ठ, सत्याधारित आणि विश्वसनीय माहिती देणारे असावे, तरच वाचनाचा खरा लाभ मिळतो. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होऊन विचारशक्ती विकसित व्हावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापिका श्रीमती सिंधुताई चव्हाण यांनी अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी होऊन वाचन संस्कृती जोपासावी, असे आवाहन केले. कार्यक्रमाचा समारोप रोकडे एस.व्ही. यांनी केला. हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# शिवराज पाटील चाकूरकर हे प्रकाश दाखवणारे दीपस्तंभ विविध क्षेत्रातील मान्यवरांची भावना : भावूक वातावरणात लातूरकरांनी केली श्रद्धांजली अर्पण






लातूर : माजी केंद्रीय गृहमंत्री व माजी राज्यपाल शिवराज पाटील चाकूरकर हे प्रकाश दाखवणारे दीपस्तंभ आहेत. प्रसिद्धीच्या झोतापासून दूर राहुन लोकांच्या हिताची त्यांनी अनेक कामे केली. सदैव राष्ट्राच्या भल्याचाच विचार केला. धर्म, पक्ष यापलिकडे जाऊन मानवतेला प्राधान्य देत त्यांनी सर्वांना जोडून घेतले. म्हणून खऱ्या अर्थाने ते अजातशत्रु होते. एक कणखर नेते, विद्वत्ता आणि नैतिक मुल्यांचे प्रतिक म्हणून ते कायम स्मरणात राहतील, अशा शब्दांत विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शिवराज पाटील चाकूरकर यांना श्रद्धांजली अर्पण केली.

शिवराज पाटील चाकूरकर यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी लातूरकरांच्या वतीने सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी माजी खासदार व माजी कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे, डॉ. अशोक कुकडे, लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार अमित देशमुख, माजी खासदार सुनील गायकवाड, लातूर अर्बन बँकेचे संस्थापक प्रदीप राठी, श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, धनंजय पाटील, ज्येष्ठ पत्रकार बी. व्ही. मोतीपवळे, व्यंकट बेद्रे, माजी कुलगुरू अशोक ढवण यांनी मनोगतातून शिवराज पाटील चाकूरकर यांच्या व्यक्तिमत्वाला उजाळा दिला.

शिवराज पाटील यांचे पुत्र शैलेश पाटील चाकूरकर, स्नुषा डॉ. अर्चना पाटील चाकूरकर, रुद्राली पाटील चाकूरकर, रुषिका पाटील चाकूरकर, राजेश्वर बुके, माजी प्राचार्य नागोराव कुंभार, सुनील कोचेटा, उदय गवारे, अभय साळुंके, रमेश बियाणी, विक्रांत गोजमगुंडे यांच्यासह राजकीय, सामाजिक, आर्थिक, विधी, कला-क्रीडा, शिक्षण अशा विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते. 'वैष्णव जन तो', 'रघुपती राघव राजाराम' या भजनांनी सभेची सुरुवात झाली. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी, काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी, लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या शोकसंदेशांचे बी. व्ही. मोतीपवळे यांनी वाचन केले. प्रा. अश्विनी रोडे, प्रा. गणेश बेळंबे यांनी सूत्रसंचालन केले.

विचारधारा वेगवेगळ्या तरी दृढ संबंध डॉ. अशोक कुकडे : साठ वर्षांपूर्वी वैद्यकीय व्यवसायासाठी मी लातूरात आलो. त्यावेळी पहिल्याच वर्षी शिवराज पाटील यांचा परिचय झाला. आमच्यातील संबंध दृढ झाले. आमच्या राजकीय विचारधारा वेगवेगळ्या होत्या. तरी एकमेकांतील संबंध दृढ होते, याचे अनेकांना आश्र्चर्य वाटत असे. भूकंपानंतर परदेशातून आलेला १ लाख डॉलर्स निधी त्यांच्यामुळेच विवेकानंद रुग्णालयाला मिळाला होता. राजकारणापेक्षा समाजकारण, राष्ट्रकारण मोठे असते, असे त्यांना वाटत असे. प्रकाशाचा मार्ग दाखवणाऱ्या दीपस्तंभाप्रमाणे त्यांचे व्यक्तित्व होते.

चाकूरकर पंतप्रधान झाले असते जनार्दन वाघमारे : प्रतिभाशाली आणि चिंतनशील व्यक्तीमत्व असलेले शिवराज पाटील यांनी आपल्या कार्यकाळात अनेक विकासकामे केली. मात्र त्याची त्यांनी जाहिरातबाजी केली नाही. लातूरच्या पाण्याचा प्रश्र्न त्यांनीच सोडवला होता. अशी लातूरमधील कितीतरी कामे त्यांच्यामुळेच मार्गी लागलेली आहेत. आपल्या जीवनात त्यांनी गरुडासारखी उत्तुंग झेप घेतली. पण, स्वतःविषयी ते कधीही बोलत नसत. २००४ मध्ये ते निवडून आले असते तर नक्कीच पंतप्रधान झाले असते. लोकांशी एकरूप झालेले, राजकारणातील संत म्हणता येईल, असे त्यांचे व्यक्तिमत्व होते.

विलासरावांना घडवण्यात शिवराज पाटलांचा वाटा अमित देशमुख : मी लहानपणापासूनच शिवराज पाटील चाकूरकर या नावाचा दबदबा पाहत आलो आहे. आजोबांकडून, वडिलांकडून, काकांकडून, आईंकडुन त्यांच्याबद्दल कामय ऐकत आलो आहे. पुढे मलाही त्यांचा स्नेह आणि आशीर्वाद लाभला. विलासराव देशमुख यांना घडवण्यात शिवराज पाटील यांचाच हात आहे. हा प्रसंग आम्ही कायम उराशी बाळगून आहोत. शिवराज पाटील यांच्या कर्तृत्वामुळे त्यांना वेगवेगळी पदे मिळत गेली. यांच्या मागे पदे पळत राहिली. त्या प्रत्येक पदांना त्यांनी योग्य न्याय दिला. इंदिरा गांधी, राजीव गांधी यांचे ते अतिशय लाडके सहकारी होते. चाकुरकरांनी लातूरचा लौकिक भारतभर आणि भारताबाहेरही वाढवला. त्यांचे व्यक्तीमत्व 'हिरो'सारखे होते.

मुल्य जगून दाखवणारे उत्तुंग नेतृत्वआदिनाथ सांगवे : शिवराज पाटील यांचे व्यक्तिमत्त्व खरोखर दीपस्तंभासारखे होते. त्यांनी सच्चेपणा, नैतिकता, विद्वत्ता, तत्वनिष्ठता ही मूल्य इतरांना सांगितली असे नाही. तर ती स्वत: जगून दाखवली. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रेरणादायी असे होते. त्यांच्या सानिध्यात आलेल्या प्रत्येकाला त्यांची मुल्य शिकता आली. त्यांची वैचारिक उंची आभाळाऐवढी होती. त्यांची संपूर्ण कारकीर्द निस्पर्ह व निष्कलंक राहिली आहे. त्यांच्या जाण्याने एक बहुआयामी व उत्तुंग व्यक्तिमत्व हरपले आहे.

सुसंस्कृत राजकारणाचा आदर्श घातला प्रदिप राठी : शिवराज पाटील यांच्या जाण्याने एक मोठे नेतृत्व लूप्त झाले. विलासराव देशमुख यांच्या मागे त्यांनीच मोठी ताकद उभी केली होती. त्यांना आमदार केले. मंत्री बनवले. शिवराज पाटील यांनी कधीही कोणाबद्दलही नकारात्मक दृष्टीकोन बाळगला नाही. ते अतिशय सुसंस्कृत नेते. त्यांनी सुसंस्कृत राजकारणाचा आदर्श घालून दिला. त्यांचे अनेक अनुयायी होतील. पण त्यांच्यासारखे कोणी होणार नाही. लक्ष्मीरमण लाहोटी : राजकारणात त्यांच्या इतकी उंची लातूरात अन्य कोणाला गाठता येईल, असे वाटत नाही. त्यांचे आचरण अनुकरणीय असेच होते. डॉ. शिवाजी काळगे : शिवराज पाटील हे अतिशय उत्तुंग नेते होते. दिल्लीत असताना त्यांची वारंवार आठवण होते.

# प्राचार्य डॉ.वसंत माळी यांना गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार जाहिर



केज/प्रतिनिधी-उल्हासनगर येथील जे.वाटुमल साधुबेला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत माळी यांना आष्टी येथील भगवान कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतिने आयोजित गंगाई-बाबाजी कला महोत्सवाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त२०२५-२६ आदर्श पुरस्कार जाहिर झाला आहे .उच्च शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल हा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार जाहिर झाला आहे.

दिनांक १ जानेवारी २०२६ रोजी आष्टी येथे या पुरस्काराचे वितरण होणार आहे. डॉ .वसंत माळी हे मुंबई विद्यापीठाच्या वनस्पती शास्त्र अभ्यास मंडळाचे चेअरमन असुन ते मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेवर प्राचार्य गटातुन सदस्य म्हणून ही काम पहात आहेत. डॉ.वसंत माळी यांनी आपल्या अध्यापनाची सुरूवात बीड जिल्ह्यातील कडा येथील आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालयातील वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख म्हणून केली.ते या महाविद्यालयात जुन १९९२ ते २०१६ पर्यंत कार्यरत होते.२०१६ पासुन ते जे.वाटुमल साधुबेला महाविद्यालय, उल्हासनगर चे प्राचार्य म्हणून ते काम पहात आहेत. डॉ.माळी यांनी आपल्या शैक्षणिक संशोधनातून वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय परिषदामधुन वनस्पती शास्त्र विषयात विद्यार्थी व संशोधकांना मार्गदर्शन केले आहे.थायलंड, दुबई, व्हियेतनाम व इतर विविध देशात आंतरराष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन केले आहे. प्राचार्य डॉ. वसंत माळी यांच्या या यशाबद्दल साधुबेला एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन माजी खासदार उत्तम सिंग पवार,सचिव नितीन बागवे, माजी आमदार भिमराव धोंडे, प्राचार्य डॉ .हरिदास विधाते यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे ही साने गुरुजींची शिकवण सर्वांच्या कृतीत आली पाहिजे-डॉ.हनुमंत सौदागर



केज/प्रतिनिधी-खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे ही साने गुरुजींची शिकवण आपल्या सर्वांच्या कृतीत आले पाहिजे असे मत डॉ. हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले ते भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालयात साने गुरुजी जयंती कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बोलत होते. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती प्राचार्य श्रीकांत लुंगारे,अधिव्याख्याता नारायण चोले ,लामतुरे ओ एस, बलाढ्ये यु. बी.,कचरे जे एस, जगदाळे एम. एच.,वामन चिगुरे,सुजित नाईकवाडे, सतीश नेहरकर आदी उपस्थित होतेछात्र अध्यापक सोनम सोनवणे, ऋतुजा इंगळे, पुनम यादव अक्षय राऊत,सुप्रिया पवार आदी विद्यार्थ्यांनी विचार मांडले.पुढे बोलतांना ते म्हणाले शेतकरी, कष्टकरी ,वंचित उपेक्षितांसाठी आयुष्यभर लढा देणारे साने गुरुजी साहित्यातून वास्तवदर्शी जीवन मांडत राहिले. विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन सेवाकार्याचा वसा सांभाळावा असे मत त्यांनी व्यक्त केले कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक ग्रंथपाल संतोष कुमार साळवी यांनी केले तर आभार रमेश रितपुरे यांनी मानले.

# लातूर मनपा निवडणुकीसाठी ५१३ नामनिर्देशन अर्जांची विक्री, एकही अर्ज दाखल नाही

लातूर :-लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून पहिल्या दोन दिवसांत मोठ्या प्रमाणावर अर्जांची विक्री झाली आहे. मात्र, अद्याप एकही नामनिर्देशन अर्ज दाखल झालेला नाही.

दिनांक २३ डिसेंबर २०२५ रोजी पहिल्या दिवशी १४४ नामनिर्देशन अर्जांची विक्री झाली होती. तर मंगळवार, दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी दुसऱ्या दिवशी ३६९ नामनिर्देशन अर्जांची विक्री झाली. त्यामुळे आतापर्यंत एकूण ५१३ नामनिर्देशन अर्जांची विक्री झालेली आहे. तथापि, आजअखेर एकही उमेदवाराने आपला अर्ज दाखल केलेला नाही.

निवडणूक निर्णय अधिकारीनिहाय पाहता, क्षेत्रीय कार्यालय क अंतर्गत सर्वाधिक ७० अर्जांची विक्री झाली असून क्षेत्रीय कार्यालय अ अंतर्गत ९८ अर्जांची विक्री झाली आहे. समाजकल्याण कार्यालय, उपविभागीय कार्यालय, जून जिल्हाधिकारी कार्यालय तसेच क्षेत्रीय कार्यालय ब येथेही अर्ज विक्री झाली असून सर्व ठिकाणी नामनिर्देशन अर्ज दाखल संख्या शून्य आहे.

आगामी दिवसांत उमेदवारांकडून अर्ज दाखल होण्याची शक्यता असून निवडणूक प्रक्रियेबाबत प्रशासन सज्ज असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

# राज्यात उत्पादित होणाऱ्या डाळिंब व अन्य फळांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील -पणन मंत्री जयकुमार रावल




मुंबई: राज्यातील शेतकरी निर्यातक्षम फळे व भाजीपाला पिकवतात. या उत्पादनांना स्पर्धात्मक दर मिळावा म्हणून आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले.

राज्यात उत्पादित झालेल्या डाळिंबाचे तीन कंटेनर वाशी येथील सुविधा केंद्रातून के.बी. एक्सपोर्ट्सचे चेअरमन प्रकाश खाखर यांनी नुकतेच ब्रिस्बेन - (ऑस्ट्रेलिया), न्यूयॉर्क, लॉस एंजेलिस- (अमेरिका) येथे निर्यात केले. या पार्श्र्वभूमीवर पणन मंत्री रावल यांनी प्रकाश खाखर यांचे अभिनंदन केले. त्यावेळी ते बोलत होते.

जागतिक बाजारपेठेत भारतीय डाळिंबांची मागणी सातत्याने वाढत आहे. राज्यात उत्पादित होणारा डाळिंब हा अमेरिका, ऑस्ट्रेलिया यासह अन्य देशात निर्यात होत आहे. टप्प्याटप्प्याने इतर फळांची निर्यात करण्यासाठी पणन विभाग प्रयत्न करत आहे. यामुळे फळे व भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांच्या मेहनतीला जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मक मूल्य मिळेल. अमेरिका, ऑस्ट्रेलिया यासह अन्य देशांमध्ये कंटेनर रवाना होणे हे राज्याच्या कृषी-निर्यात व शेतकऱ्यांना उत्पन्नवाढीच्या दृष्टीने प्रोत्साहित करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. येणाऱ्या काळात निर्यात सुविधा केंद्रातून मोठ्या क्षमतेने डाळिंब निर्यात केले जाणार असल्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले.

# केजच्या न्यायालयातील सर्वपरिचित व्यक्तिमत्व पडद्याआड!



केज/प्रतिनिधी-केजच्या न्यायालयालासतत 'व्हायब्रेट' ठेवून चैतन्य निर्माण करणारे जेष्ठ विधिज्ञ जनार्धनराव आदमाने यांचे बुधवार रोजी सकाळी बीड येथे अल्पशा आजाराने निधन झाले. वयाच्या ८५ व्या वर्षी त्यांनी अंतिम श्र्वास घेतला. वकिली व्यवसायात राहून इंग्रजी विषयावरील त्यांचे प्रभुत्व व संवाद कौशल्याने त्यांनी इतरांवर मोठी छाप टाकली होती. त्यांच्या या ज्ञान व संवाद कौशल्याचा अनेकांना हेवा वाटायचा.

त्यांच्या अवांतर ज्ञानाचा आवाकाही खूप मोठा होता. खुप सामान्य व साधेपणाचे जीवन जगताना त्यांचा पेहराव अत्यंत टापटीपीचा व शिस्तबद्ध असायचा. वयाच्या सत्तरीनंतरही कडाक्याच्या थंडीतही त्यांच धावणे व व्यायाम सुरूच होता. सकाळी पहाटे चार वाजता उठून त्यांच्या संपर्कातील लोकांना ते दरवाजावर हाक देऊन जागे करायचे.

त्यांचे जीवन नवीन पिढीला प्रेरणादायी होते. बुधवार दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या सर्वच मुलींनी त्यांची अखेरपर्यंत खुप सेवा करून त्यांना मुलगा नसल्याची उणीव कधीच भासू दिली नाही.

त्यांच्यावर बुधवार रोजी ११-०० वाजता बीड येथील संत भगवान बाबा स्मशानभूमीत येथे अंतिम संस्कार पार पडले.

# न्यू तोतलाडोह पुनर्वसित गावातील विस्थापितांना नियमाप्रमाणे सुविधा द्या - मदत व पुनर्वसन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल



मुंबई : पेंच अभयारण्यातील न्यू तोतलाडोह गावातील पुनर्वसनामुळे विस्थापित झालेल्या लोकांना नियमाप्रमाणे सर्व सुविधा देण्यात याव्यात अशा सूचना मदत व पुनर्वसन राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल यांनी याविषयी मंत्रालयात झालेल्या बैठकीमध्ये दिल्या.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार न्यू तोतलाडोह गावाचे विस्थापन झाल्याचे सांगून राज्यमंत्री जयस्वाल म्हणाले की, वाडंबा येथे विस्थापित झालेल्या या गावाला कोणत्याही सुविधा मिळालेल्या नाहीत. आर्थिक मोबदला घेऊन त्यांना फक्त जमिनी दिल्या आहेत. त्यांना नागरी सुविधा देणे गरजेचे आहे. कायद्यानुसार त्यांना सुविधा देण्याची कार्यवाही करण्यात यावी, अशा सूचनाही राज्यमंत्री जयस्वाल यांनी दिल्या.

दरम्यान, यावेळी सांगली जिल्ह्यातील कणेगाव या पूर बाधित गावच्या पुनर्वसनविषयही बैठक घेण्यात आली. त्यावेळी कालबद्ध कार्यक्रम आखून हा प्रश्र्न मार्गी लावावा. गावठाणातील जुन्या जागेचा रहिवासी वापर करता येणार नाही या अटींवर जागेची मालकी मूळ मालकाकडे ठेवण्याविषयी जिल्हाधिकारी यांनी प्रस्ताव द्यावा. ज्यांनी पैसे भरले आहेत व स्थलांतरासाठी तयार आहेत त्यांना जागा वाटपाचे काम एक महिन्यात पूर्ण करावे अशा सूचनाही राज्यमंत्री जयस्वाल यांनी दिल्या.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.